अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



श्रेष्ठ लेखक, कवी व समाजसुधारक लोकशाहीर
अण्णा भाऊ साठे
यांना स्मृतीदिनानिमित्त
विनम्र अभिवादन!

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३०० ■ शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 300 ■ Friday Dt.18 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# त्या दिवशी तडजोडीच्या नावाखाली केज पोलीस स्टेशनच्या आवारात लक्ष्मण बेडसकर प्रेमींच्या माध्यमातून लाखों रुपयांची उधळण झाल्याचे चर्चेला उधाण?

## स्वतःला दलित म्हणून घेणारे नेते दलित महिलेवर झालेल्या अत्याचाराला पैशाच्या मोहापोटी बेईमान झाले काय?

■ सुनील हिरवेसारखा दलितांचा एकमेव वाघ महिला अन्याय अत्याचाराच्या विरोधात एकटा रिंगणात आपल्याच बेईमान लोकांशी झुंजला!

■ केज पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक उणवणे नेमका कोणाचा फोन आल्यानंतर त्यांच्याकडून कारवाईला बगल देण्यात आली?

■ हा प्रकार केवळ प्रशासनाचा अपयश नसून, राजकीय संरक्षणामुळे बिनधास्त वागणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनोबलाचं लक्षण मानावं लागेल?

■ आ.नमिताताई, महिला आमदार म्हणून आता तरी आवाज उठवाल का? पीडित महिलेला तुमचा आधार हवा आहे!






बीड । प्रतिनिधी

**केज तालुक्याचे विद्यमान गटशिक्षण अधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका महिलेने छेडछाडीचा आरोप केल्यानंतर शिक्षण क्षेत्रासह संपूर्ण बीड जिल्ह्यात एकाच खळबळ उडाली. शिक्षण विभागात कोठ्यावधींचा घोटाळा करून ताठ मानेने मिरवणाऱ्या या नराधमाचा सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात असून अनेक दलित संघटनांनी या घटनेचा जाहीर निषेध व्यक्त केला आहे.**



याविषयी सविस्तर माहिती अशी की, एका दलित महिलेवर अत्याचार झाल्याची घटना घडल्यानंतर १५ जुलै २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता संबंधित महिला गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात गेली असता अर्धवट माहिती घेऊन तिला घरी पाठवण्यात आले.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) चे तालुका अध्यक्ष सुनील हिरवे संबंधित महिलेला घेऊन पुन्हा पोलिस ठाण्यात गेले. गुन्हा दाखल करत असताना चार वेळा लाईट गेल्याचा बहाणा करण्यात आला. त्या महिलेला वेगळ्या रूममध्ये बसवून सुनील हिरवेना बाजूला करण्यात आले. मात्र स्वतःला दलित म्हणून घेणाऱ्या नेत्यांपैकी एक ईश्वर सोनवणे ठ्ठझख चा माजी कार्यधाक्ष ज्याची याच पार्टीमधून हकालपट्टी करण्यात आली. तो त्या पोलीस स्टेशनच्या रूममध्ये महिलेजवळ बसून, सबंधित महिलेवर तक्रार मागे घेण्यासाठी कशोसीने दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे फुले नगरचे माजी नगर सेवक कपिल मस्के, नगर पालिकेचा पराभूत उमेदवार शेखर शिरसाट, भाजपचे शहर संघटक दत्ता धस, राष्ट्रवादीचे सध्याचे नगरसेवक भाऊसाहेब गुंड, बेडसकर प्रेमी

▶ पान २ वर

### गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकरांच्या पाठीशी राजकीय हात? पोलीस आणि प्रशासनाचं संशयास्पद मौन!

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका महिलेसोबत छेडछाडीचा गंभीर आरोप करण्यात आले असूनही अद्याप त्यांच्या विरोधात ठोस कारवाई झाली नाही. या प्रकरणी पीडित महिलेने केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी तब्बल नऊ तास थांबली, परंतु याप्रकरणात राजकीय हस्तक्षेपाची जोरदार चर्चा रंगली आहे. महिला पोलीस ठाण्यात न्यायासाठी संघर्ष करत असताना संबंधित पोलीस निरीक्षक उनवणे यांनी गुन्हा नोंदविण्यापासून टाळाटाळ केली. एवढंच नाही तर, बेडसकर यांना वाचवण्यासाठी काही अधिकारी व स्थानिक राजकीय मंडळी प्रयत्नशील असल्याची माहिती सुत्रांकडून पुढे येत आहे. सामान्य शिक्षकावर असे आरोप झाले असते, तर तात्काळ निलंबन, चौकशी आणि कठोर कारवाई झाली असती. मात्र, गटशिक्षणाधिकारी पातळीवरील अधिकाऱ्यावर कारवाईसाठी प्रशासनाकडून विलंब होत असल्याने संपूर्ण प्रकरणात सत्ताधाऱ्यांचा हात आहे का? असा सवाल निर्माण होत आहे. या प्रकरणात पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी त्वरित हस्तक्षेप करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

# संजय नगरात मांडुरके विक्रमाच्या कार्यकिर्दीत शहराच्या स्वच्छतेवर अस्वच्छतेचा वनवास संपेना

## खाजगी टेंडर मुळांवर स्वच्छतेची गाडी येईल का रुळावर?

### अनेक भागात नालीसफाईला मुहूर्त मिळेना स्वच्छता विभागाला कांहीच कळेना मुख्याधिकारी, उघडा डोळे बघा नीट स्वच्छतेची यंत्रणा करा नीट

गेवराई । प्रतिनिधी

संजय नगर भागांमधील नालीसफाई गेल्या दोन महिन्यापासून केली नाही येथील नागरिकांनी वेळोवेळी नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सांगू न ही नालीसफाई होत नाही त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती वाटत आहे. गेल्या दोन महिन्यापासून नालीतील घाण न काढल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरली आहे या दुर्गंधीमुळे डासांचे प्रमाण वाढला आहे. डासांपासून डेंगू मलेरिया यासारखे आजार होण्याची भीती आहे. लहान मुले महिला ज्येष्ठ नागरिक यांना यापासून खूप त्रास होत आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्या थोडासा जरी पाऊस पडला तरी सर्व आल्या तुडुंब भरतात आणिनाली मधील घाण पाणी रस्त्यावर येत आहे त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून घाण पाण्यातून चालावे लागते.

सविस्तर वृत्त असे की सध्या जोरदार पावसाला सुरुवात झाली असली तरीही अद्याप गेवराई शहरातील संजय नगर भागात नालेसफाई झालेली नाही. गेली नेहमीच नालेसफाईकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे विविध शहरातील नाले तुंबलेल्या अवस्थेत आहेत. सर्वच शहरांमध्ये पावसाळ्याच्या आधी नालेसफाई करण्यात येते. गेवराई नगरपरिषदेल मात्र, अद्याप तसा मुहूर्त गवसलेला नाही. नालेसफाई

▶ पान २ वर

### मुख्याधिकारी तथा प्रशासक मांडुरके साहेब नुसतं टेंडर देऊन जमत नसतं प्रत्यक्षात मोहिम फत्ते कराच

लहान मुले महिला वृद्ध व्यक्ती हे आजारी पडू नये म्हणून नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री. मांडुरके साहेब नुसतं टेंडर देऊन जमत नसतं तर प्रत्यक्षात मोहीम फत्ते करा गेल्या अनेक दिवसापासून संजय नगर भाग हा स्वच्छते पासून वंचित आहे याकडे आपण गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन संजय नगर भागातील नाली सफाई करण्याचे ताबडतोब आदेश द्यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# बहिणीच्या खुनाच्या गुन्ह्यातील फरार आरोपीला केले जेरबंद

## बीड शहर पोलीस ठाणे डीबी पथकाची कामगिरी



बीड । प्रतिनिधी

लग्नाला विरोध केल्याने विष प्राशन केलेल्या बहीण व तिच्या प्रियकरावर हल्ला केला होता. यामध्ये बहिणीचा उपचारादरम्यान मृत्यु झाला होता तर प्रियकर वाचला होता. या गुन्ह्यातील फरार आरोपीला पाच वर्षांनंतर जेरबंद करण्यात बीड शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकास यश आले आहे.

विठ्ठल उर्फ सोनू प्रकाश काळवणे असे पकडलेल्या आरोपीचे नाव आहे. बहीण आणि तिच्या प्रियकराची २०१४ मध्ये आरोपीने हल्ला केला होता. या हल्यात बहिणीचा उपचारादरम्यान मृत्यु झाला असल्याने या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात शहर गु.र.नं. १६५/२०१४ भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, ५०४, ३४, २०१ अन्वये गंभीर स्वरूपाचे गुन्हा दाखल असून, त्यास जन्मठेप व १० हजार रूपये दंडाची शिक्षा न्यायालयाने सुनावलेली आहे. शिक्षा झालेला हा आरोपी पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पसार झाला होता. तो मागील पाच वर्षांपासून फरार होता. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपींना शोधा असा आदेश पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दिला आहे. त्यानुसार बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांनी डीबी पथकास याबाबतीत सूचना केली होती. या आरोपीचा शोध सुरू असतानाच फरार आरोपी बीड येथील एमआयडीसी भागात हनुमाननगर येथील घरी पत्नीला भेटण्यासाठी आलेला असल्याची माहिती मिळाली.

यावरून बीड शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने अखेर या फरार आरोपीला घरातून ताब्यात घेतले आहे. आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस हवालदार गहिनीनाथ बावनकर, पोलीस अंमलदार राम पवार यांनी केली आहे.

# एनएच-२११ बाह्यवळण भूसंपादनात २२ कोटींचा घोटाळा

## उपजिल्हाधिकारी संतोष राऊत आणि नगररचनाकार चालठाणकर यांच्या संगनमताने शासनाची फसवणूक?

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ साठी करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत तब्बल २२ कोटी ६१ लाख ४३ हजार ७३५ रुपयाचा आर्थिक घोटाळा समोर आला आहे. या प्रकरणात तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) श्री. संतोष राऊत आणि तत्कालीन नगररचनाकार श्री. चालठाणकर यांनी संगनमत करत गंभीर स्वरूपाच्या अनियमितता केल्याचे स्पष्ट झाले आहे. भूसंपादनाच्या निवाड्यांमध्ये अवैध अकृषिक आदेश, छायांकित प्रतीवर निर्णय, कर न भरता अकृषिक दर, आणि अवैध सुधारित दर यासारख्या विविध प्रकारांद्वारे संबंधित भूधारकांना कोट्यवधी रुपयांची अतिरिक्त नुकसानभरपाई दिली गेली.

**फक्त छायाचित्रांवरून अकृषिक मान्यता!**

गट क्र. १४, बीड तर्फ देशमुख मधील जमीन 'अकृषिक' असल्याचे दाखवून नुकसानभरपाई ठरवण्यात आली, परंतु या जमिनीचे अकृषिक आदेश केवळ छायांकित प्रत स्वरूपात होते. महसूल अभिलेखात याचा कोणताही दाखला नाही.

**कर नाही, पण अकृषिक दराने भरपाई**

भूधारकांनी अकृषिक कर भरल्याचे कोणतेही पुरावे नसताना, तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे कोणतेही चिन्ह नसताना देखील, शासकीय दरापेक्षा ४-५ पट जास्तीच्या अकृषिक दराने भरपाई दिली गेली.

**नगररचनाकाराची मंजुरी न घेताच आदेश!**

नगररचना विभागाच्या स्पष्ट विरोधात जाऊन, तहसील कार्यालयाने नगररचनाकाराची शिफारस न घेता अकृषिक आदेश जारी केले. हे शासन परिपत्रक (१९७२ व २००१) च्या सरळ उल्लंघनासमान आहे.

**'सांगितलेल्या' भूखंडांसाठी भरपाई, प्रत्यक्षात जागा शेतजमीन!**

गट क्र. १०५, १०९, ११७, ११८, ११९, १२२, १२३, १४८ या गटांची भूखंड म्हणून भरपाई ठरवण्यात आली. मात्र गुगल इमेजेस व ७/१२ उताऱ्यांवरून ही जमीन पूर्णतः शेतीयोग्य असल्याचे स्पष्ट होते.

**शासनाला तब्बल २२ कोटींचा फटका**

बीड तर्फ देशमुख, शिदोड, आणि इतर निवाड्यांमध्ये केलेल्या अनियमित, बेकायदेशीर निर्णयांमुळे शासनाला एकूण २२ कोटींपेक्षा अधिक रकमेचा वित्तीय भुर्दंड बसला आहे.

**प्रशासन गप्प, दोषींवर कारवाई शून्य**

या गंभीर प्रकरणात आजपर्यंत ना चौकशी झाली, ना दोषींवर कोणतीही कारवाई, उलट काही अधिकारी तर निवृत्तीनंतर खासगी प्रकल्पांशी जोडले गेले असल्याचे वृत्त आहे. प्रश्न असा आहे की, एवढ्या मोठ्या प्रकरणावर सरकार डोळेझाक का करत आहे? संबंधित प्रकरणाची उइख किंवा एसीबीमार्फत चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची संपत्ती व आर्थिक व्यवहार तपासून शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही व्हावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.

## आरोग्य व पर्यावरण सेवा सप्ताहास केजमध्ये उत्स्फुर्त प्रतिसाद

केज । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या २२ जुलै रोजी येणाऱ्या वाढदिवसाचे औचित्य साधून तसेच माजीमंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या १५ जुलै रोजीच्या वाढदिवसानिमित्त नगर पंचायत केज, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी केज शहर यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य जनहित व पर्यावरण सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. या सेवा सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी केज शहरात महिलांसाठी मोफत रक्त तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमास केजच्या नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे उद्घाटन केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते केजच्या नगर पंचायत कार्यालयात सकाळी ११ वाजता संपन्न झाले.

केज शहरातील महिलांनी मोठ्यासंख्येने सहभाग नोंदवला व आपल्या आरोग्याच्या तपासण्या करून घेतल्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महादेव जोगदंड यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन श्री.नागरगोजे यांनी केले. या कार्यक्रमास कनिष्ठ अभियंता शीतल सय्यद (महावितरण), सामाजिक कार्यकर्त्या मनीषा घुले, नगरसेवक राजू इनामदार, सतीश डांगे, अशोक गायकवाड, लखन हजारे, फेरोज शेख, मनोज मस्के तसेच पत्रकार मुब्बशीर खतीब यांच्यासह केज शहरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



बीड : शिवसंग्राम चे शहराध्यक्ष तथा स्व. नेते विनायकराव मेटे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी मा. सुहासराव पाटील यांच्या पोटावर नुकतीच मोठी सर्जरी करण्यात आली. आज त्यांचा वाढदिवस, शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी त्यांची आज सांत्वनपर भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी पंचायत समिती चे माजी सदस्य नवनाथ प्रभाळे, बबन मने, मनोज जाधव, पंकज कुटे, गणेश लोणकर सह आदी.



शेवगाव निवासी श्री संत गजानन महाराज यांची पालखी आषाढी वारी करून परतीच्या मार्गावर असतांना आज बीड शहरात मुक्कामी आहे. बालाजी मंदिर पेठ बीड या ठिकाणी दुपारच्या भोजनासाठी विसवली असता शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना दोन हजार मोतीचूर लाडू चे वाटप केले. यावेळी संजय महाद्वार, नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, राजाभाऊ माहुवाले, संदीप उबाळे, राजाभाऊ हुरकुडे, गणेश लोणकर, सतीशसिह परदेशीं, दिलीप पवार, रंगनाथ पैठणकर सह शिवसैनिक उपस्थित होते.

पान १ वरून...

## त्या दिवशी तडजोडीच्या नावाखाली केज पोलीस स्टेशनच्या आवारात...

विकास मस्के, बाळासाहेब जोगदंड, असंख्य शिक्षक, मिसाळ वकिलासह वकिली क्षेत्रातील अनेक दिग्गज, शिक्षण क्षेत्रातील अनेक कर्मचारी हे देखील पैशाच्या जोरावर तडजोड करायला पोलीस स्टेशनच्या आवारात आल्यामुळे एका गुन्हेगार व्यक्तीला वाचवण्यासाठी पैशाच्या व राजकीय ताकतिच्या जोरावर कशा पद्धतीने सर्व स्तरातून प्रयत्न केला जात होता याचा संपूर्ण चित्रपट सकाळी १०:३० ते रात्री ९:३० वाजेच्या पोलीस स्टेशनच्या उउढत कॅमेऱ्यात कैद झालेला आहे. त्यावेळच्या लाईव्ह सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याची रीतसर चौकशी झाल्यास सत्य बाहेर आल्याशिवाय राहणार नाही.

या महिलेवरील छेडछाडीच्या प्रकरणांमध्ये लक्ष्मण बेडसकर यांनी सबंधित महिला दलित असल्याकारणाने, हुशारीने, पैशाला बेईमान होणारी काही दलित कार्यकर्त्यांची फौज पोलीस स्टेशनच्या आवारात पाठवल्याचे स्पष्ट चित्र जिल्ह्यासमोर आलेले आहे. एका दलित महिलेची छेडछाड करण्यात येते आणि पीडित महिलेच्या बाजूने उभे राहण्याऐवजी आरोपीच्या बाजूने उभे राहणाऱ्या मूठभर षंड दलित नेत्यांचा सर्व जिल्ह्यातून जाहीर निषेध होत आहे.

## संजय नगरात मांडुरके विक्रमाच्या कार्यकिर्दीत

करावयाची झाल्यास मशीनरींची गरज आहे. त्यासाठी सुमारे तीन कोटींचा निधी आवश्यक आहे. प्रशासनाने याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभागाकडून मागणी पत्राच्या द्वारे लवकरच उपायोजना करावी अशी इच्छा व्यक्त होत असल्याचे बोलले जात आहे. पावसाळ्यापूर्वी नाल्यातील कचरा व गाळ काढला जातो. नाले, लहान मोठ्या गटारी साफ न केल्यास मुसळधार पावसामुळे पाणी तुंबते. तसेच ते संजय नगर नागरी वस्तीत अनेकांच्या घरात पाणी जाण्याचा व शिरण्याचा धोका असतो? त्यामुळे नेहमी पावसाळ्यापूर्वी सर्व नगरपरिषद क्षेत्रात नाले, लहान मोठ्या गटारी यांची सफाई करण्याकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले जाते. यंदा अनेक नगरपरिषदेने ही अपुर्ण कामे काही पूर्ण होण्याच्या मार्गावर नाहीत. खाजगी टेंडर दिल्यामुळे ह्या अडचणीचा सामना लोकांना सहन करावा लागत आहे जाणीवपूर्वक माजी आमदार लक्ष्मण पवार यांचा बालेकिल्ला असल्यामुळे नगरपरिषद प्रशासन व खाजगी टेंडर यांच्या संगनमताने या भागाकडे दुर्लक्ष केले जात आहे का? असा सवाल नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम वाघमारे सेवानिवृत्त; लिंबागणेशकरांकडून भव्य सत्कार




लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड पोलीस खात्यात ३३ वर्षे कर्तव्यनिष्ठ, शिस्तबद्ध आणि समाजाभिमुख सेवा बजावणारे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गौतम भानुदास वाघमारे दिनांक ३० जून २०२५ रोजी सेवानिवृत्त झाले. लिंबागणेश परिसरात तसेच पंचक्रोशीत 'वाघमारे भाऊ' या नावाने परिचित असलेल्या या व्यक्तिमत्त्वाने आपल्या कार्यकाळात अविस्मरणीय ठसा उमटवला. त्यांनी बीड शहर पोलीस ठाणे, बीड ग्रामीण, नेकनूर, गेवराई, वडवणी तसेच लिंबागणेश पोलीस चौकी येथे प्रामाणिक सेवा बजावली. त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेचा गौरव म्हणून ४३ पदकांनी त्यांना सन्मानित करण्यात आले, ही बाब त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष आहे.

वाघमारे भाऊंच्या सेवेचे वैशिष्ट्य म्हणजे - मानवी मूल्यांची जपणूक, संघर्षमय कुटुंबांना आधार, तसेच निर्दोष नागरिकांना न्याय मिळवून देणे. त्यांच्या कार्यकाळात एकाही निर्दोष व्यक्तीवर खोटा गुन्हा दाखल झाला नाही. या बाबत बोलताना डॉ. गणेश ढवळे म्हणाले, वाघमारे भाऊ म्हणजे सत्याला सत्य आणि खोट्याला खोटं ठामपणे सांगणारे अधिकारी. त्यांनी कधीही कोणाची पिळवणूक केली नाही. त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातही ते आदर्श ठरले. त्यांच्या तीन मुलांपैकी एक वकील, एक डॉक्टर आणि एक प्राध्यापक झालेला आहे. ही त्यांच्या संस्कारांची आणि शिक्षणातील मूल्यांची फलश्रुतीच आहे. लिंबागणेश येथे पोलीस मित्र ग्रुपचे तुळशीराम पवार, योगेश शिंदे आणि पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्या पुढाकाराने भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, सुत्रसंचलन हरिओम क्षीरसागर तर आभारप्रदर्शन डॉ.गणेश ढवळे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव तर प्रमुख पाहुणे म्हणून नेकनुर पोलिस स्टेशनचे पो.उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे, सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख उपस्थित होते. या कार्यक्रमात राजेभाऊ गिरे, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, दादा गायकवाड, औदुंबर नाईकवाडे, सरपंच बिभिषण मुळीक (पोखरी घाट), विश्वंभर गिरी (महाजनवाडी), मुळुकवाडीचे कृष्णा पितळे, विष्णुपंत घरत महाराज तसेच इतर ग्रामपंचायत सदस्य, पंचक्रोशीतील अनेक मान्यवर, नागरिक, हितचिंतक उपस्थित होते. भावपूर्ण वातावरणात सत्कार समारंभ पार पडला. गौतम वाघमारे यांनी आपल्या भाषणात स्पष्ट केलं.

# अण्णाभाऊ साठे : आंबेडकरी चळवळीच्या दृष्टिकोनातून

अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेल्या साहित्यावर आंबेडकरी विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. त्यांनी २६ कथासंग्रहा मधून जवळपास ३०० कथा, ४० कादंबऱ्या, १५ लोकनाट्य, नाटक, लेख, शाहिरी, गाणे, लावणी, इत्यादी...असे विपुल प्रमाणात अण्णाभाऊंचे साहित्य प्रकाशित आहे. हे ललित लेखन नाही किंवा नुसता शब्दांचा फुलवरा नाही तर अस्सल जिवंत साहित्य त्यांच्या अनुभवातून त्यांनी मांडलेले आहे.

त्यांनी लिहिलेल्या आंबेडकरी कथा

१)बुद्धाची शपथ: ही आंबेडकरवादी कथा आहे. जातीव्यवस्था आणि अस्पृश्यते विरोधात बाबासाहेबांनी धर्मांतर केले होते. त्या धर्मांतराचा प्रभाव, गाव खेड्यातील महार जातीवर खोलवर पडला होता. बौद्ध धर्माने झालेला सकारात्मक बदल सूक्ष्म निरीक्षणाद्वारे अण्णाभाऊ मांडतात. आणि या कथेचा शेवट 'बुद्धम् शरणम् गच्छामि' या शब्दांनी करतात.

२)सापळा: डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतिकारी चळवळीमुळे समाजामध्ये जे प्रबोधन झाले, याचे वास्तव दर्शवणारी ही कथा अण्णाभाऊंनी लिहिली. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात २० मार्च १९२७ ला महाड येथील कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या बैठकीत महत्वपूर्ण ठराव पारित झाला.

मेलेली जनावरे ओढून टाकण्याच्या बाबतीत बहिष्कृत लोकांवर अवलंबून न राहता आपली आपणच व्यवस्था करावी. या ठरावामुळे महारांणी मेलेली जनावरे ओढणे बंद केले. त्याचे तंतोतंत पालन गाव खेड्यात सुरू होते. त्यामुळे गावातील सवर्ण मंडळी बदला घेण्याची योजना बनवतात परंतु महार जातीचे लोक या सापळ्याला उत्तर देतात. अशी आंबेडकरी कथा अण्णाभाऊ लिहितात.

३)उपकाराची फेड: अण्णाभाऊ साठे यांची ही कथा भारतीय समाजव्यवस्थेतील एक भयाण वास्तव अधोरेखित करणारी आहे. अतिशूद्र समजल्या गेलेल्या, अस्पृश्य जातीमधील 'अस्पृश्यता' उपकाराची फेड या कथेतून अण्णा भाऊंनी चित्रित केली आहे. मळू महार, लखू मांग, शंकर चांभार आणि मन्या परीट ही चारही अस्पृश्य जातीतील माणसं. ज्यांच्यावर पिढ्यानपिढ्या धर्माच्या नावावर अन्याय अत्याचार होत आलेला आहे अशा ह्या अस्पृश्य जातीतील चौघांची ही कथा आहे. भारतातील जातीव्यवस्था क्रमिक असमानते वर उभी आहे, अशी जी बाबासाहेब आंबेडकर मांडणी करतात, त्या संदर्भात ही कथा आहे.


४)वळण: शाहू महाराज आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वात, २१/२२ मार्च १९२० ला माणगावच्या परिषदेत जे ठराव पारित झाले, त्यातील ठराव क्रमांक १०, मेलेल्या जनावराचे मांस कोणत्याही जातीच्या माणसाने खाणे हा गुन्हा आहे. असे कायद्याने मानले जावे असा या सभेचा अभिप्राय आहे. नुसार महार लोकांनी जनावराचे मांस खाणे सोडले होते. नवती या संग्रहात 'वळण' या नावाची एक सुंदर दलित कथा आहे अण्णाभाऊंनी लिहिली आहे. ज्यामध्ये महार लोकांनी मेलेल्या जनावराची मटन खाणे सोडून दिले होते, या घटनेचा परिणाम महार आणि मांगावर काय होतो, या संदर्भात ही कथा आहे.

५)कोंबडी चोर: खुळंवाडी या कथासंग्रहातील अण्णाभाऊं ची ही एक गाजलेली वरवर विनोदी वाटणारी पण आतून विषमतेवर प्रहार करणारी महत्वाची कथा आहे. स्वतंत्र भारतात आपण स्वतंत्र आहोत का असा मूलभूत प्रश्नही कथा उभा करते. अर्थात या कथेचा आशय 'यह आजादी झूठी है देश की जनता भूखी है', असा आहे.

६) सोन्याचा मणी: आपल्या मुलीकडे राहणारी एक म्हातारी दलित स्त्री, डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला कशाप्रकारे मदत करते अशा आशयाची कथा आहे. मेल्यानंतर तोंडामध्ये सोने ठेवण्याची प्रथा आहे, त्या म्हातारीने एक सोन्याचा मणी त्यासाठी ठेवलेला असतो, परंतु बाबासाहेबांच्या चळवळीसाठी ती तो मणी देऊन टाकते. आंबेडकरी चळवळ ही कष्टकरी कामकरी आणि दलितांच्या त्याग आणि बलिदानावर उभी आहे, अशी या कथेतून अण्णाभाऊ मांडणी करतात.

इ) अण्णाभाऊंच्या साहित्यातील आंबेडकरांचा लिखित स्पष्ट उल्लेख :

अण्णाभाऊ साठे यांनी डॉ.बाबासाहेब




आंबेडकर यांचा स्पष्टपणे उल्लेख त्यांच्या लोकनाट्यात, कादंबरीमध्ये, कथेमध्ये आणि त्यांनी लिहिलेल्या लेखांमध्ये स्पष्टपणे दिसतो, १९४६ ला निवडणुकीसाठी त्यांनी 'देशभक्त घोटाळे' नावाचे लोकनाट्य लिहिले त्यामध्ये 'जग बदल घालुनी घाव, सांगून गेले मला भीमराव' हे प्रसिद्ध कवन गायले, १९५८ ला त्यांनी 'प्रबुद्ध भारत' या बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या वर्तमानपत्रात 'दलित शाहिरी' या मथळ्याखाली एक लेख लिहिला यामध्ये बाबासाहेबांचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. त्यांची उत्कृष्ट कादंबरी फकीरा ही १९५९ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली. अण्णाभाऊंनी, 'बुद्धाची शपथ' कथा लिहिली. ज्यामध्ये बाबासाहेबांचा स्पष्टपणे उल्लेख आहे. 'संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव' हा लेख, 'युगांतर' मधून प्रसिद्ध झाला, ज्यामध्ये बाबासाहेबांचा स्पष्टपणे उल्लेख आहे.

खालील लिखाणामध्ये स्पष्टपणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा उल्लेख सापडतो

१) देशभक्त घोटाळे, लोकनाट्य १९४६
२) दलित शाहिरी, लेख १९५८
३) फकीरा कादंबरी १९५९
४) बुद्धाची शपथ, कथा
५) संयुक्त महाराष्ट्राचा लढा व जातवास्तव, हा लेख

उ) बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊंची प्रत्यक्ष भेट:

१) रमेश राक्षे यांनी लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे गौरव ग्रंथ, बार्टी, पुणे यांनी जो ग्रंथ प्रकाशित केला त्यामध्ये ये आझादी झुठी है या शीर्षकाखाली लेख लिहिला आहे. १९४२ साली १७ जूनला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथे शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे अखिल भारतीय अधिवेशन भरविले. त्यात सुमारे पन्नास हजार पुरुष व २५ हजार स्त्रिया असे ७५ हजार लोक उपस्थित होते. याद्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय पातळीवर शक्तिप्रदर्शन करून ब्रिटिशांवर दबाव आणण्याचा व त्याद्वारे आपले हक्क अधिकार मिळविण्याचा जोरदार प्रयत्न केला. (या अधिवेशनाला अण्णाभाऊ साठे उपस्थित असल्याचे पुरावे मिळत आहेत. असे लिहिले आहे, पुढे एका भाषणात रमेश राक्षे यांनी ' लोकशाहीर ही पदवी अण्णाभाऊंना डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिली असे म्हटले आहे.

२) डॉ.बाबुराव गुरव यांनी 'लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे गौरव ग्रंथ', बार्टी, पुणे, प्रकाशित ग्रंथामध्ये, 'लोकशाहीर आणि क्रांतिसिंह' या लेखामध्ये अण्णाभाऊ साठे आणि बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली असे लिहितात. अण्णाभाऊ साठे आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रत्यक्षाची पहिली भेट १९४९ साली मुंबईत झाली. अण्णाभाऊ, १९४० पासून बाबासाहेबांना पाहत होते. ऐकत होते. अण्णा भाऊंनी आपली सर्वश्रेष्ठ कादंबरी फकीरा डॉ.बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीस अर्पण केली. अण्णाभाऊंच्या मनावर बाबासाहेबांच्या महानिर्वाणाची घटना कधीही भरून न येणारी जखम करून गेली. असे लिहितात.

३) खुशाल खडसे यांनी 'शब्द साहित्य का निर्माता अण्णाभाऊ साठे' नावाचे हिंदी मधून पुस्तक लिहिले, ते लिहितात कई बार बाबासाहब एवं अण्णाभाऊ इनकी मुलाखत के बारे में पाठक अनभिज्ञ रहते हैं ! डॉ.बाबासाहेब आंबेडकर और अण्णाभाऊ की मुलाकात कब हुई? ऐसे कई सवालात उठाते हैं ! मजदूर सभाओं (ट्रेड यूनियनों) कम्युनिस्ट, देशभक्ति आदि विषयों पर उनके भाषण या तो छापने नहीं दिए जाते थे या एकदम तोड़ मरोड़कर छापे जाते थे ! इसका आंशिक कारण राजनीति रहा है और आंशिक पुराने परंपरागत मिथ्या विश्वास ! मगर उसका जवाब हां है ! आण्णाभाऊ आंबेडकरी विचारों से सिर्फ प्रभावित ही नहीं बल्कि उनकी विचारधारा उसी प्रवाह में थी !

डॉ बाबासाहेब आंबेडकर और आण्णाभाऊ आंठ बार मिलने तथा उनके चर्चा के प्रसंग दिखाई देते हैं ! इसका एक उदाहरण यानी नागपुर का प्रसंग ! २० अप्रैल १९५२ में नागपुर के धंतोली एरिया में मेहाडिया चौक में जहां आज यशवंत स्टेडियम खड़ा है, वहां मजूर पक्ष की सभा हुई ! उस सभा के डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यक्ष थे तो आण्णाभाऊ प्रमुख अतिथि थे ! साथ में उस समय के युवा कम्युनिस्ट कार्यकर्ता ए.बी.बर्धन भि थे ! मजुर पक्ष का लाल झंडा और कम्युनिस्ट पक्ष का लाल झंडा इसका संगम हुआ था ! कार्यक्रम के पश्चात आण्णाभाऊ और बाबासाहब के भोजन का आयोजन लक्ष्मण भावे और अन्य साथियों ने किया था ! वह आज भी साक्षी के रूप में जिंदा है! असे लिहितात.

यावरून हे स्पष्ट होते की डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि अण्णाभाऊ साठे यांची भेट झालेली आहे.

ऊ) निष्कर्ष

१) अण्णाभाऊ साठे हे आंबेडकरवादी होते.
२) अण्णाभाऊ साठे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भेट झाली होती.
३) अण्णाभाऊ साठे पहिले 'आंबेडकरी कथालेखक' आहेत.
४) कम्युनिस्ट विचारधारा भारतातील जातीव्यवस्था नष्ट करण्याच्या दृष्टीने अपुरी आहे. याची जाणीव अण्णाभाऊंना होती.
५) कथा आणि कादंबरीतून जाती व्यवस्थेमधील खालच्या स्तरातील वेगवेगळ्या जाती मधून नायक शोधण्याचे कार्य अण्णाभाऊंनी केले. इतर जातींनी बदलाची, परिवर्तनाची, प्रगतीची, क्रांतीची प्रेरणा घ्यावी असे अण्णाभाऊंना वाटत होते
६) अण्णाभाऊंनी फक्त स्वतःच्या जातीच्याच नव्हे तर समदुःखी जाती समूहांच्या दुःखाला वाचा फोडली.
७) अण्णाभाऊंनी बुद्धाची शपथ कथा लिहून एक प्रकारे 'स्वयंप्रकाशित व्हा' हा मार्ग दाखवला.
८) अण्णाभाऊ, 'जग बदल घालुनी घाव सांगुनी गेले मला भीमराव' या कवना द्वारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मार्गच जग बदलू शकतो,असे ठामपणे मांडतात.
९) अण्णाभाऊ साठे फकीरा कादंबरी बाबासाहेबांच्या झुंजार लेखणीला अर्पण करून, बाबासाहेबांच्या लेखणीला झुंजार उपाधी देऊन, संघर्ष करा, लढा द्या हा बाबासाहेब आंबेडकरांचा मार्ग दाखवतात.
१०) अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य, फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारसरणीला पुढे घेऊन जाणारे आहे.

समारोप

अण्णाभाऊ साठे यांनी कादंबरी, कथा, लोकनाट्य, शाहिरी आणि विविध लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख केला आहे. आंबेडकरी चळवळीचा अभ्यास ते १९४२ पासून करत होते. १९५६ नंतर ते आंबेडकरी चळवळीकडे वळाले, १९६६ पर्यंत ते कम्युनिस्ट चळवळीमध्ये होते. शेवटचे तीन वर्ष त्यांनी कम्युनिस्ट पक्षासोबतचे अथवा कलापथका सोबतचे सर्व संबंध तोडले. अण्णाभाऊ ख-या अर्थाने मानवतावादी होते. आयुष्यभर त्यांनी तत्वाशी तडजोड केली नाही. त्यांचे संपूर्ण साहित्य हे 'विद्रोही साहित्य' आहे. शोषित, वंचित, कष्टकरी, दलित, शेतकरी, कामगार, गुन्हेगारी जाती, भटक्या जाती जमाती, यांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी साहित्य लिहीले. या सर्व समूहाचे अण्णाभाऊ कैवारी होते.

आज त्यांच्या स्मृतीदीना निमित्त अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन

**सिद्धार्थ शिनगारे**
**अध्यक्ष : भारतीय हितकारिणी संघ**
**(लेखक, 'अण्णाभाऊ साठे आंबेडकरी चळवळीच्या दृष्टिकोनातून', या पुस्तकाचे)**

# आजी-माजी आमदारांची जोडी असूनही रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागेना!

## बीड नगर परिषदेचे तर अस्तित्वच हरवले : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार संघाला कधी नव्हे ते एकाजीवाचे आजी-माजी आमदार गेल्या काही वर्षांपासून मिळालेले आहेत. मात्र या जोडीकडून बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागत नाहीये आणि बीड नगर परिषदेचे तर अस्तित्वच हरवले आहे असे उद्विग्न मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा टॉवर, बलभीम चौक, जुना बाजार मार्गे चांदणी चौकापर्यंत चा रस्ता. राजुरी वेस ते बुंदलपुरा मार्गे कबाड गल्ली, माळीवेस पोलीस चौकी पर्यंत चा रस्ता. कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई मार्गे बुंदलपुऱ्याचा रस्ता. बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस चौक पर्यंतचा रस्ता. हे चारही रस्ते अत्यंत भयान अवस्थेत गेलेले आहेत. या रस्त्यावरून चालताना पादचारी, सायकल धारी, दुचाकीस्वार, तीन चाकी व चार चाकी वाहने चालविणारे अशा सर्वांनाच अक्षरशः नरक यातना भोगाव्या लागत आहेत. रस्त्यावर पडलेले शेकडो नाही तर हजारो खड्डे आणि त्यात जमणारे पावसाचे पाणी यामुळे मोठ्या प्रमाणात हाल-अपेष्टा सोसाव्या लागत आहेत.



विशेष म्हणजे सध्या बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि त्यांचे विश्वासू शिलेदार म्हणून ओळखले जात असलेले माजी आमदार अशी या आजी-माजी आमदारांची जोडी सोबत असूनही या चार रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागत नाहिये. त्यात पुन्हा अजून एक विशेष बाब म्हणजे यातील राजुरी वेस ते बुंदलपुरा कडे जाणाऱ्या रस्त्यावर दस्तूरखुद्द या जोडीतील माजी आमदारांचे घर आहे. एका सोबत दुसरे मिळाल्यास जसे त्याचे मूल्य वाढते तसे बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेला आजी आमदारासोबत माजी आमदार मिळाल्याने मतदार संघाचा विकास वाढेल असे वाटत होते. परंतु बीड विधानसभा मतदार संघ तर सोडा शहरातील रस्ते व नाल्यांची दयनीय अवस्था सुद्धा सुधरेना. याला बीड शहरवासियांचा कपाळ करंटेपणा म्हणावा की, या आजी-माजी आमदारांची अकार्यक्षमता? असा प्रश्न बीड शहरवासीयांमधून उपस्थित केला जात आहे.

बीड नगर परिषदेला साधे शहर स्वच्छ ठेवता येत नाही तर त्याच्याकडून इतर विकास कामे होण्याची अपेक्षाच व्यर्थ आहे. असे उद्विग्न मत व्यक्त करत गेल्या काही वर्षात बीड नगर परिषदेचे अस्तित्वच हरवले असून जवळपास प्रत्येक बाबीत अक्षरशः अंधार झाला असल्याची टीका ही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

## लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती अध्यक्षपदी राजू मोटे यांची सर्वानुमते निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी अंबाजोगाई तालुक्यातील मौजे मुरब्बी या गावातील सर्व जाती धर्मातील आजी माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य जिल्हा परिषद सदस्य सर्व पक्षाची नेते मंडळी यांचे उपस्थितीमध्ये सत्यशोधक लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीची बैठक सुरू झाली. यावेळी मात्र सर्वांनी राजू मोठे यांची अध्यक्षपदी नियुक्ती करावी म्हणून एक मुखाने सहमती दर्शविली राजू मोटे हे सामाजिक क्षेत्रामध्ये स्वतःला झोपून दिलेला आहे. सर्वसामान्य जनतेच्या सुखदुःखामध्ये राजू मोटे हा धावून जाणारा कार्यकर्ता आहे. त्यामुळे सर्वानुमते राजू मोटे यांची निवड मुरबी येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कार्यकारणी खालील प्रमाणे निवडण्यात आलेली आहे.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मुरंबी आधारस्तंभ बाळासाहेब श्रीरंग मोटे, अध्यक्ष राजु भुजंगराव मोटे, उपाध्यक्ष दयानंद दगडु मोटे, कोषाध्यक्ष सतोष मोकुंद मोटे, सचिव रमेश अशोक गव्हाणे, सहसचिव आनंत शिवाजी मोटे, सदस्य वैभव मोटे, अमोल गव्हाणे, प्रेम मोटे, आनंत गव्हाणे, जयराम मोटे, माऊली मोटे, सुदर्शन मोटे, वरीष्ठ नागरीक मोकुंद मोटे, महादेव कांबळे, बाळासाहेब मोटे, दगडु मोटे, भुजंगराव मोटे, अंबादास जोगदंड, राम मोटे, बालासाहेब मोटे, अशोक गव्हाणे, चंद्रकांत गव्हाणे, विजय मोटे, विठ्ठल मोटे, शंकर उदार, विकास मोटे, विलास काका मोटे, केशव मोटे, पांडुरंग मोटे, विश्वानाथ मोटे, ज्ञानोबा उदार, सचिन गव्हाणे, लखन गव्हाणे, भगवान गव्हाणे, अण्णा गव्हाणे, मोहन मोटे, नितिन गव्हाणे, नितिन मोटे, दिपक मोटे, श्रीकांत मोटे, आप्पाराव मोटे, बालाजी कांबळे आदी सर्व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर व समाजसेवक गाव पातळीवरील सर्व उपस्थित होते यावेळी राजू मोटे यांच्यावरती शुभेच्छा वर्षा होत आहे.

## शिरूर तालुक्यातील कुठल्याही व्यक्तीला शासकीय कामात अडथळा आल्यास संपर्क साधावा : शिवसेना

शिरूर कासार । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील सर्व शेतकरी बांधवांना एक नम्रतेची विनंती करतो आपलं कुठल्याही बँकेतलं खातं जर त्या बँकेने होल्ड केलं असेल तर त्वरित आमच्याशी संपर्क करा तुमचं होल्ड केलेलं खातं आम्ही लगेच काढून देऊत शिरूर तालुक्यातील कुठल्याही व्यक्तीला तहसीलमध्ये अडचण असेल पंचायत समितीमध्ये अडचण असेल भूमी अभिलेख ऑफिसमध्ये अडचण असेल कृषी कार्यालयामध्ये अडचण असेल पोलीस स्टेशनचे मध्ये सहकार्याची गरज असेल किंवा अडचण असेल ग्रामपंचायत मध्ये अडचण असेल रजिस्ट्री ऑफिसला अडचण असेल पोस्ट ऑफिस ला अडचण असेल कॉलेजमध्ये अडचण असेल जिल्हा परिषद शाळेमध्ये अडचण असेल सरकारी ऑफिस कुठलेही असू द्या खाजगी ऑफिस कुठल्याही असू द्या शिरूर तालुक्यातील प्रत्येक व्यक्तीची



अडचण ही आमची अडचण व समस्या हेच समजून आम्ही शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाने तोच विश्वास आमच्यावर दाखवून आम्हाला पद नियुक्ती देऊन जनतेची सेवा करण्यासाठी जनतेचे सेवक म्हणून पाठवलेला आहे. म्हणून आम्ही निस्वार्थपणे आपल्या शिरूर कासार तालुक्यातील होता होईल तेवढे आम्ही सेवा करत आहोत आम्ही तुमचे सेवक आहोत तुम्ही आम्हाला बिंदास काम सांगा आम्ही तुमचे सालकरी म्हणून मोलकरी म्हणून आम्ही तुमचं नक्कीच काम करूत व कसलीही अडचण असेल तर त्वरित आमच्याशी संपर्क करा शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाचा तालुकाप्रमुख म्हणून या पक्षाचे शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख म्हणून जनतेचा सेवक म्हणून आम्ही तुमचे सेवक म्हणून आम्हाला हक्काने काम सांगा आपलाच विश्वासू शिवसेनेचा तालुकाप्रमुख सोपान काका मोरे व शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर व सर्व सहकारी शिवसैनिक शिरूर कासार जिल्हा बीड यांनी केले.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार द्या : शिंदे

सिरसाळा । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारने केंद्र सरकारकडे शिफारस करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे याच्या ०१ ऑगस्ट २०२५ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे याच्या जयंती निमित्ताने भारतरत्न पुरस्कार प्रदान करून सन्मानित करावे यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री बीड जिल्ह्याचे पालक मंत्री अजित दादा पवार व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे तसेच महाराष्ट्रातील सर्व खासदार, आमदारांनी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना पुरस्कार देण्यासाठी केंद्र शासनाकडे मागणी करावी तसेच भारत देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी महाराष्ट्र राज्यातील तमाम मातंग समाजाच्या भावनेचा आदर करून साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना भारतरत्न पुरस्कार देण्यात यावा ही सर्व सामाजिक संघटना व सर्वपक्षीय पक्षाने एकनिष्ठ काम करावे व मातंग समाज बांधवांनी मागणी केली आहे.



## लोक जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांना Z+ सुरक्षा देण्यात यावी : राजेश वाहुळे

बीड । प्रतिनिधी

लोक जनशक्ती पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री चिराग पासवान साहेब यांना एका मातेफिरू ने जिवे मारण्याचे धमकी दिली आहे त्यामुळे सदर मातेफिरू वर कारवाई झाली पाहिजे पण या पाठीमागे कोणत्या आदर्श शक्ती असण्याची दाट शक्यता आहे.

बिहारमध्ये निवडणूक येऊ पाहत आहेत त्यामुळे अशा अज्ञात व्यक्तीकडून असे प्रकार केले जात आहेत. त्यामुळे केंद्र शासनाच्या गृहमंत्रालयाने याचा शोध लावून जनतेसमोर आणणे गरजेचे आहे आमच्या नेत्याच्या जीवास धोका असल्याने त्यांच्या सुरक्षेत आणखीन वाढ करून न+ सुरक्षा केंद्रीय गृहमंत्री कार्यालयाने तातडीने करावी अशी मागणी लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने केंद्रीय गृहमंत्री यांना राज्यपाल महोदय यांच्यामार्फत करण्यात येत आहे.



या आशयाचे निवेदन उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई जिल्हा बीड यांना देताना युवा चे मराठवाडा प्रदेशाध्यक्ष राजेश वाहूळे जिल्हाध्यक्ष अशोक काळे पाटील केज तालुका अध्यक्ष गंगाधर पोळ परळी विधानसभा तालुका अध्यक्ष विशाल शेवाळे विद्यार्थी तालुकाध्यक्ष आदित्य चौरे तालुका उपाध्यक्ष सागर मुद्दुले व शुभम तरकसे आदी उपस्थित होते.

## सौ पुष्पाबाई सुलाखे यांचे दु:खद निधन

बीड । प्रतिनिधी

मूळ चकलांबा येथील रहिवासी असलेल्या आणि हल्ली मुक्काम बीडमध्ये असलेले सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या पत्नी सौ पुष्पाबाई वय ७० यांचे बुधवारी दु:खद निधन झाले.



सौ पुष्पाताई विश्वनाथ (बबनराव) सुलाखे यांचे बुधवार दि १६ जुलै रोजी रात्री १० वाजता बीड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्या ७० वर्षाच्या होत्या, ज्योतिषकार तथा सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा डॉ. अमोल सुलाखे आणि तीन मुली, जावई, सून असा परिवार आहे, अंत्यविधी गुरुवार दि १७ रोजी सकाळी भगवानबाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत करण्यात आला.



## टाकरवण येथे लोकशाहीर साहित्यरत्न डॉ.अण्णा भाऊ साठे यांना अभिवादन

टाकरवण । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवण येथील साठे चौकात व ग्रामपंचायत कार्यालयात स्मृती दिनानिमित्त लोकशाहीर, साहित्यरत्न, कॉम्रेड डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृति दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी सरपंच सुनील तौर, उप सरपंच दयानंद गोबरे, मानवी हक्क अभियान सचिव कपिल आडागळे, रोजगार सेवक किसन गंनगे, सदस्य जनार्धन आडागळे, रज्जाक इनामदार, लक्ष्मण गरड, लक्ष्मण आडागळे, सुंदर आडगळे, ज्ञानोबा आडागळे, टोपाजी आडागळे, शाहू आडागळे, योगेश कानडे, बंडूराम आरबे, अशोक गरड, विठ्ठल गरड, परमेश्वर सुरवसे, विठ्ठल आडागळे, अशोक आडागळे, किरण धोत्रे, सुनील धोत्रे, रमेश पट्टेकर, संतोष आडागळे, रमेश आडागळे, संजय आडागळे, सुदाम आडागळे, सुदाम नाटकर, नितीन लोखंडे, रवी आडागळे, इंद्रजीत आडागळे, राहुल नाटकर, रामेश्वर आडागळे, राहुल आडागळे, वचिष्ट आठवे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री संतसेना महाराज केश शिल्पी महामंडळाच्या प्रलंबित निवडी जाहीर करा : कैलास कावरे

सिरसाळा । प्रतिनिधी

श्री संत सेना महाराज केश शिल्पी महामंडळाच्या अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळाच्या प्रलंबित निवडी जाहीर कराव्यात या मागणीसाठी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व शिवसेनेचे लोकसभेतील गटनेते संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्याकडे निवेदनाद्वारे सिरसाळातील शिवसेना नेते तथा सर्कलप्रमुख कैलास कावरे यांनी मागणी केली आहे.

युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री संत सेना महाराज केश शिल्पी महामंडळाची घोषणा मागील अधिवेशनात झाली असून त्यांच्या अध्यक्ष उपाध्यक्ष व संचालक मंडळाच्या निवडी ह्या प्रलंबित असून या निवडीमुळे आज नाभिक समाजातील तरुण बांधवांना या महामंडळाच्या लाभापासून वंचित रहावे लागत आहे. लवकरात लवकर महायुती सरकारने याबाबतचा तात्काळ निर्णय घ्यावा व किमान या महामंडळाला २०० कोटी रुपये या मंडळाला देण्यात यावे असे ही दिल्याल्या निवेदनात म्हटले आहे. यामुळे राज्यातील नाभिक समाजातील तरुण स्वताच्या पायावर भक्कम ऊभा रहावून मुख्य प्रवाहात येईल व सर्व नाभिक हा समाज पूर्ण आपल्या महायुतीच्या पाटीशी ताकतीनिशी उभा राहिल्याशिवाय राहणार नाही असे ही दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. लवकरात लवकर श्री संत सेना महाराज केश शिल्पी महामंडळाच्या निवडी करून जाहीर करून नाभिक समाजाला न्याय देण्याची भूमिका राज्यातील आपल्या महायुती सरकारने घ्यावी व हे सरकार नाभिक समाजाच्या पाठीशी ठामपणाने उभे असल्याचे दाखवून द्यावे असे शिवसेना नेते कैलास कावरे यांनी पत्रकात म्हटले आहे.



पुढे बोलताना ते म्हणाले की, यावेळी उपमुख्यमंत्री नामदार एकनाथ शिंदे यांनी राज्यातील महायुती सरकार हे नाभिक समाजाच्या पाठीशी ठामपणाने उभे राहील अनेक महामंडळाच्या नियुक्ती या राहिल्या असून लवकरच आपण श्री संत सेना महाराज केश शिल्पी महामंडळाच्या नियुक्त्या जाहीर करून नाभिक समाजाला न्याय देण्याची भूमिका हे महायुती सरकारची आहे अशी सकारात्मक भूमिका यावेळी साहेबांनी मांडले व तीच भूमिका संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी देखील निवेदनावर मांडली, असे शिवसेना नेते तथा सर्कलप्रमुख कैलास कावरे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हणटले आहे.

### भाजप निष्ठावंत कार्यकर्त्याला न्याय कधी मिळणार

## अशोक घोलप उर्फ मामा यांनी पक्षासाठी केले अविरतपणे काम

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील सौंदना येथील अशोक घोलप हे व्यक्तिमत्त्व गेल्या १८ वर्षापासून भारतीय जनता पार्टी पक्षामध्ये एक मताने काम करीत आहे. स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेबांचा एक सच्चा कार्यकर्ता त्यांच्यावर जीवापाड प्रेम करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून घोलप यांच्याकडे पाहिले जात होते. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकारणी सदस्य मध्ये ज्यांचे पक्ष मध्ये शून्य काम आहे त्या कार्यकर्त्याला पक्षाने पद दिल आहे. इथे निष्ठावंत कार्यकर्ते अशोक घोलप यांना पक्षाने का डावले अशी चर्चा सध्या चालू आहे. बीड तालुक्यामध्ये अशोक घोलप यांनी अनेक कार्यकर्ते भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जोडले आहेत.



अनेक शाखा आणि कार्यक्रम अनेक समाज उपयोगी कार्यक्रम या ठिकाणी सर्कलमध्ये घेतलेले आहेत. त्यांचे नाव या सर्कल मध्ये होत आहे. २००९ या साली भारतीय जनता पार्टीच्या या ५१ शाखा यांनी स्थापन केले आहेत. अशोक घोलप निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून जिल्ह्यामध्ये त्यांची ओळख आहे आणि त्यांनी आपल्या पक्षाच्या माध्यमातून अनेक कार्यकर्ते त्यांनी सुद्धा विरोधक सुद्धा त्यांनी अंगावर घेतले आहेत. आपल्या पक्षासाठी अशोक घोलप यांनी पक्षासाठी अनेक केसेस सुद्धा अंगावर घेतल्या होत्या. गेली अनेक वर्ष अशोक घोलप यांनी निष्ठावंत भाजपचा एक सैनिक म्हणून या पक्षामध्ये काम केलं आहे. त्यांना पक्ष्यांनी का डावल व ज्याचे पक्षांमध्ये शून्य काम आहे त्या कार्यकर्त्याला पद दिली आहेत हा सर्वसामान्य कार्यकर्त्यावर अन्याय होतो का नाही याची सुद्धा चर्चा होत आहे. अशोक घोलप या व्यक्तिमत्वाला पक्षाने यांचा बारकाईने अभ्यास करून त्यांना जिल्हा बॉडीवर घेण्यात यावे अशी मागणी भाजपचे कार्यकर्ते संदीप अण्णा गांडगे, प्रमोद गोरे, अमोल चव्हाण, सुरेश वैद्य, भरत मस्के, सुखदेव धट, जगन्नाथ कदम, प्रवीण कतले आजी कार्यकर्ते मागणी करीत आहेत.

## डॉ. विघ्नेंसाठी जनमताचा वाढता दबाव, विकासाच्या अजेंड्यावर जनतेचा विश्वास; भाजपने उमेदवारी देण्याची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत पारगाव-घुमरा गटात डॉ. लक्ष्मण विघ्ने यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्यापासून आता एका नव्या राजकीय घडामोडीने वेग घेतला आहे. डॉ. विघ्ने यांच्या दोन दशकांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याची पोचपावती म्हणून, भारतीय जनता पक्षाने (भाजपा) त्यांनाच उमेदवारी द्यावी, अशी जोरदार आणि एकमुखी मागणी आता थेट जनतेतून होऊ लागली आहे. केवळ एक आश्वासक चेहरा म्हणूनच नव्हे, तर गटात भरीव विकास करण्याची क्षमता असलेले नेतृत्व म्हणून जनता त्यांच्याकडे पाहत आहे.

### कार्यकर्त्यांचा एकच सूर: आमचा उमेदवार निश्चित, पक्षाने शिक्कामोर्तब करावे

पारगाव-घुमरा गटातील राजकीय समीकरणे डॉ. विघ्ने यांच्या संभाव्य उमेदवारीने आधीच बदलली होती. मात्र, आता सामान्य मतदार आणि भाजपाचे कार्यकर्ते यांनी स्वतःहूनच त्यांच्या नावाला पसंती देण्यास सुरुवात केली आहे. डॉक्टर आमच्यासाठी नवीन नाहीत, ते गेली वीस वर्षे आमच्या सुखदु:खात धावून येत आहेत. पक्षाने केवळ त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब करावा, विजयाची हमी आम्ही देतो, अशा प्रकारच्या प्रतिक्रिया गटातील गावागावांतून उमटत आहेत. लोकांच्या या स्फूर्त पाठिंब्यामुळे पक्षातील इतर इच्छुकांचे धाबे दणाणले आहेत.



### डॉ. विघ्नेंचा संभाव्य विकास अजेंडा: गटाच्या सर्वांगीण प्रगतीचा संकल्प

डॉ. विघ्ने निवडून आल्यास गटाचा चेहरामोहरा बदलू शकतात, असा विश्वास जनतेला वाटतो. त्यांच्या संभाव्य विकासकार्याच्या अजेंड्यामध्ये खालील मुद्द्यांचा समावेश असण्याची शक्यता वर्तवली जात आहे, ज्यावर लोकांमध्ये चर्चा सुरू आहे. शेती आणि जलसंधारण: शेतकऱ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि शासकीय योजनांची माहिती पोहोचवणे. तसेच, जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबवून सिंचनाचा प्रश्न मार्गी लावणे व शेतीला जोडधंद्याची दिशा देणे. पायाभूत सुविधांचे बळकटीकरण: गटातील प्रत्येक वाडी-वस्ती मुख्य रस्त्याला जोडण्यासाठी पाठपुरावा करणे. 'हर घर जल' योजनेतून स्वच्छ पिण्याच्या पाण्याची खात्री करणे आणि विजेच्या समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रयत्न करणे. आरोग्य आणि शिक्षण: प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थिती सुधारून तिथे २४ तास आरोग्यसेवा उपलब्ध करणे. जिल्हा परिषदेच्या शाळांना डिजिटल बनवणे आणि विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रांची सोय करणे. युवकांसाठी रोजगार निर्मिती: युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवून त्यांना स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे. तसेच, शासकीय आणि खाजगी कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय: 'प्राणीमित्र' म्हणून त्यांची ओळख असल्याने, पशुपालकांसाठी उत्तम दर्जाच्या पशुवैद्यकीय सेवा, चारा छावण्या आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी विशेष योजना राबविण्यावर त्यांचा भर असेल. शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी: केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना गरजू आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेवर अंकुश ठेवून पारदर्शक कारभार करणे.

### भाजपा नेतृत्वासमोर मोठे आव्हान

जनतेतून उमेदवारासाठी होणारी मागणी आणि विकासाच्या अपेक्षांचे हे चित्र कोणत्याही पक्षासाठी एक सुवर्णसंधी आहे. मात्र, यामुळे पक्षाच्या नेतृत्वासमोर एक मोठे आव्हान देखील उभे राहिले आहे. पक्षांतर्गत निष्ठा आणि गटबाजीच्या राजकारणाला महत्त्व द्यायचे की, जनतेचा कौल मान्य करून विजयाची सर्वाधिक शक्यता असलेल्या उमेदवाराला संधी द्यायची, यावर आता पक्षश्रेष्ठींना निर्णय घ्यावा लागणार आहे.

### समीकरणे स्पष्ट: लढत अटळ

एकंदरीत, डॉ. लक्ष्मण विघ्ने यांच्या उमेदवारीसाठी वाढता मागणीचा जोर आणि त्यांच्याकडून असलेल्या विकासाच्या अपेक्षा पाहता, भाजपासाठी हा निर्णय घेणे सोपे राहिलेले नाही. पक्षाने त्यांना उमेदवारी दिल्यास ही निवडणूक अत्यंत चुरशीची आणि लक्षवेधी ठरेल. पक्षाचा अंतिम निर्णय काहीही असो, पण एका उमेदवारासाठी संपूर्ण मतदारसंघ एकवटल्याचे चित्र पाटोदा तालुक्याच्या राजकारणात प्रथमच पाहायला मिळत आहे, हे मात्र नक्की.

## ढेकणमोह-जुजगव्हाण शिव पाणंद रस्ता तहसीलदार शेळके यांनी केला खुला

# एक वर्षापासून सुरु असलेला वाद अखेर मिटला

बीड । प्रतिनिधी

तहसीलदार शेळके यांनी गुरुवारी (१७ जून रोजी) ढेकणमोहा ग्राम पंचायतला भेट देऊन गावातील लोकांच्या समस्या व पिक विमा संदर्भात अडचणी जाणून घेतल्या. गावातील लोकांचे फार्मर आयडी काढुन घेण्याचे आवाहन केले. ढेकणमोहा-जुजगव्हाण शिवेवरुन जाणारा अंतर्गत वादाने अडवलेल्या रस्त्याची तक्रार प्रलंबित होती. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सुनावणी घेवुन रस्ता खुला करण्याचा आदेश दिला होता. तथापि काही शेतकऱ्यांनी आपसात असलेल्या वादामुळे शिवरस्ता होऊ दिला नव्हता सुमारे तीन किलोमीटर रस्त्यांपैकी एक किलोमीटर रस्ता लोकसहभागातून करण्याचे राहून गेले असल्याचे शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले. कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत हा रस्ता तात्काळ सामोपचाराने या वेळी खुला करण्यात आला.




महाराष्ट्राचे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत. बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची, शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत. विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न महसूल अधिकाऱ्यांमार्फत सोडवण्यास सुरुवात केली आहे.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे. बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावीत असे सांगत असतात. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव ह्या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत. गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो.

ग्राम महसुल सज्जा ढेकणमोहा अंतर्गत येणाऱ्या मौजे ढेकणमोहा व जुजगव्हाण या दोन गावांच्या शिवेवर असणाऱ्या ब्रम्हनाथ वस्ती कडे जाणारा पाणंद रस्त्याच्या मागणीवरून अर्जदार दादासाहेब नामदेव थापडे व इतर ७ जण यांनी केली होती. ढेकणमोहा - नाळवंडी रोडपासुन ते जुजगव्हाण तलाव पर्यंत जाण्यायेण्यासाठी पूर्वापार हा दक्षिण - उत्तर जाणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन गुरे-जनावरे व शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग, व्यवसाय करत आहेत. गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार चालत आलेला आहे परंतु तो रस्ता पुर्णपणे आमच्या बाजुच्या शेत जमिनीमधुन काढलेला आहे असे म्हणुन रस्ताचे सुरू असलेले काम बंद करुन खडी व मुरूम टाकु न देता तो मध्येच अडवला होता. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदार यांनी स्वत: स्थळ पाहणी केली व अर्जदार व गैरअर्जदार यांना रस्त्याचे व दळणवळणाचे महत्त्व सांगुन रस्त्यामुळे शेती उत्पादन कसे वाढवावे याकडे लक्ष देण्यास सांगितले. त्याचे महत्त्व शेतकरी यांना कळाले. दोन्ही बाजुच्या शेतकरी यांना सामोपचाराने समजावून सांगितले व मागील वर्षाभरा पासून चालत आलेला वाद मिटवला. जाण्या-येण्यासाठी ढेकणमोहा व जुजगव्हाण या गावच्या शिवावरुन २० फुटाचा रस्ता करावा अशी भूमिका शेतकरी यांनी घेतली. त्यानुसार हा रस्ता करून देण्यात आला.

तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख, ढेकणमोहा यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळ पाहणी करण्याबाबत यापूर्वीच आदेशित केले होते. तहसीलदार शेळके यांच्या आदेशानंतर स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले.

यावेळी कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके, ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख, गावातील प्रतिष्ठित नागरिक सरपंच शिवाजी गाडीवान, ग्राम विकास अधिकारी बाबुराव तांदळे, उपसरपंच परमेश्वर थापडे, तंटा मुक्ती अध्यक्ष कैलास देवकते, पोलीस जमादार चत्रभुज डापकर, ग्राम पंचायत सदस्य सतिश देवकते, अनंत करांडे, बळीराम थापडे, रावसाहेब थापडे, संजय शिंदे, मिलींद शिंदे, चत्रभुज थापडे, सिद्धेश्वर थापडे, दादासाहेब थापडे, गणेश थापडे, महादेव थापडे, नितीन थापडे, बापुराव थापडे, संदिपान थापडे, शिवाजी जाधव, भारत देवकते, गणेश गलांडे, रमेश गलांडे, दादा जाधव, भगवान थापडे, बालासाहेब थापडे तसेच आजू बाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके बीड यांचे आभार मानले.



## वाघिरा आणि मेंगडेवाडी येथील शेतकऱ्यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी या योजनेचा लाभ घ्यावा : सरपंच बांगर

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी आणि शेतकरी समृद्ध होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी ही योजना चालू केलेली आहे. ही योजना सहा वर्षासाठी असून यामध्ये ठराविक गावांची निवड केली जाते. याआधी या योजनेचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून आता दुसऱ्या टप्प्याला सुरुवात झालेली आहे. या दुसऱ्या टप्प्यामध्ये वाघिरा आणि मेंगडेवाडी या दोन्ही गावांची निवड झाली आहे.

या योजनेमध्ये वैयक्तिक लाभ, वैयक्तिक व्यवसाय करण्यासाठी चा लाभ आणि सार्वजनिक जलसंधारणाची कामे होणार आहेत. ग्रामपंचायत ने या योजनेसाठी समिती स्थापन केली आहे. प्रथमदर्शी शेतकऱ्यांची बैठक शिवार फेरी महिलांची सभा माती परीक्षण नमुने व विहीर निरीक्षण या सर्व गोष्टी पार पडल्या आहेत.

विशेष म्हणजे तालुक्यातील गावापैकी वाघिरा आणि मेंडेवाडी गावातील शेतकऱ्यांनी यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. सध्या गावामध्ये सार्वजनिक कामाचा आराखडा बनवण्याचे काम चालू झाले असून शेतकऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालय येथे येवून आपली नोंद करून घ्यावी अशी विनंती सरपंच यांनी केली आहे.

## खोटी माहिती पसरवून समाजात तेढ निर्माण करणाऱ्या सादिक इनामदार व सहकाऱ्यांचा निषेध : असद कुरेशी यांचा जाहीर खुलासा

धारूर । प्रतिनिधी

धारूर शहरात सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणारे काही अपप्रवृत्तीचे लोक वारंवार खोट्या बातम्यांच्या माध्यमातून शहरातील शांततेला धक्का देत आहेत. १६ जुलै २०२५ रोजी 'आरंभ' दैनिकात प्रसिद्ध झालेली बातमी ही त्याच प्रयत्नाचा भाग असून, सदर बातमीमध्ये श्री. असद कुरेशी यांच्याविरोधात दिलेली माहिती पूर्णतः खोटी, एकतर्फी आणि बदनामी करणारी आहे.



विशेष म्हणजे, ही खोटी माहिती पसरवण्यामागे इंजिनियर सादिक इनामदार यांची थेट भूमिका असल्याचा विश्वासार्ह पुराव्यांसह उघड झाला आहे. धारूर शहरातील काही स्वार्थी आणि द्वेष पसरवणाऱ्या लोकांबरोबर संगनमत करून त्यांनी ही बातमी पेरली आहे. समाजात धार्मिक तेढ निर्माण करणे, असद कुरेशी यांची प्रतिमा मलीन करणे व त्यांच्या सामाजिक कार्याला आळा बसवणे, हा यामागचा मुख्य हेतू होता.

असद कुरेशी हे गेल्या अनेक वर्षांपासून धारूरमधील अल्पसंख्यांक, वंचित आणि गरजू नागरिकांच्या न्यायासाठी लढत आहेत. त्यांनी कोणतीही इनामी जमिनीची बेकायदेशीर विक्री, कब्जा किंवा भूमाफिया स्वरूपातील कृती केली नाही. उलटपक्षी, त्यांनी नियमबद्ध पद्धतीने महाराष्ट्र वक्फ मंडळाकडे अर्ज करून न्याय मागितला आहे. माझ्या विरोधात खोटे आरोप करून माझी प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न सादिक इनामदार व त्यांच्या गटाकडून केला जात आहे. या सर्व गोष्टींची सखोल चौकशी व्हावी आणि समाजात असत्य पसरवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई व्हावी, अशी माझी मागणी आहे, असे असद कुरेशी यांनी ठामपणे सांगितले.

धारूर पोलीस ठाण्यात असद कुरेशी यांच्याविरोधात कोणताही गंभीर गुन्हा सिद्ध झालेला नाही. तरीही सादिक इनामदार यांनी पत्रकारांमार्फत असत्य बातम्या पेरून सामाजिक सौहार्द बिघडवण्याचा प्रकार केला आहे. यासंदर्भात कायदेशीर कारवाईचा विचार सुरू असल्याचे सूत्रांकडून समजते. सत्य आमच्या सोबत आहे. मी समाजात शांतता आणि न्यायासाठी काम करत राहणार. परंतु खोटी माहिती पसरवणाऱ्यांना कायद्याने थांबवलेच पाहिजे, असेही श्री. असद कुरेशी यांनी सांगितले.

## महेबुब नगर माजलगाव येथे विद्युत पोल टाका : नाजेर कुरेशी

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव शहरात नवीन वस्ती महेबुब नगर येथे विद्युत पोल टाकण्यात यावे, अशी मागणी येथील नागरीक मागीत तीन वर्षापासुन करत आहे. तरी येथील या बाबीकडे म. रा. वि. वि. कंपणीचे दुर्लक्ष होताना दिसत आहे.



तरी या ठिकाणी लोकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. येथे विज पुरवठा होत नसल्याने लोकांना आंधारात राहावे लागत आहे. त्यामुळे आजुबाजूला दाट वस्ती नसल्यामुळे रात्री साप, विंचु निघत आहे व यामुळे जिवीत हाणी होण्याची दाट शक्यता आहे. शहरात चोरीचेही प्रमाण वाढल्यामुळे चोरी होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तरी यासर्व बाबीकडे आपण गांभीर्याने लक्ष देवुन तात्काळ आठ दिवसाच्या आत विद्युत पोल टाकावे नसता येथील लोकांना सोबत घेऊन आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे चालू वार्ताचे पत्रकार नाजेर कुरेशी यांनी उपकार्यकारी अभीयंता यांना निवेदनद्वारे असा इशारा दिला आहे.

# होळच्या राशन माफियांवर गुन्हा दाखल करून परवाना रद्द करा

### भगवान बाबा युवासेनेची प्रशासनाकडे मागणी; कारवाई न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील होळ येथील राशन दुकानातून गरीबांसाठी आलेले ४४ क्विंटल धान्य काळ्या बाजारात विक्रीसाठी नेत असताना धारूर पोलिसांनी दि. १४ जुलै रोजी टेम्पो (क्र. एम.एच. ४४ यू २२५७) पकडून मोठा काळाबाजार उघडकीस आणला आहे. उपसरपंच बाळासाहेब घुगे यांच्या कोलंबस सहकारी संस्थेअंतर्गत चालणाऱ्या राशन दुकानातून त्यांचा भाऊ अशोक घुगे याच्यामार्फत हे धान्य विक्रीसाठी नेत असल्याचे उघड झाले असून, वाहन चालक इब्राहिम शेख याने पोलिसांसमोर स्पष्ट कबुली दिली आहे याप्रकरणात धारूर पोलिसांनी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी भगवान बाबा युवासेनेच्यावतीने शुक्रवारी (दि.१८) जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.



भगवान बाबा युवासेनेचे अध्यक्ष विजय केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली अंबाजोगाईचे उपजिल्हाधिकारी दीपक वजाळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी युवा नेते धनराज लाटे, राम घुगे, पत्रकार उत्तरेश्वर शिंदे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. निवेदनात म्हटले की, धारूर येथील महसूल व पोलिस प्रशासनाने टोलवाटोलवी न करता होळ येथील राशन दुकानदार व उपसरपंच बाळासाहेब घुगे, अशोक घुगे यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करावा. संबंधित राशन दुकानाचा परवाना रद्द करावा. पुरवठा निरीक्षण अधिकाऱ्यांनी घेतलेले जवाब दुकानदाराच्या नातेवाईकांसमोर दबावाखाली घेतले गेले असून, ते ग्राह्य धरू नयेत. दोषींवर तात्काळ कठोर कारवाई करून धान्य काळाबाजार प्रकरणाचा सखोल तपास करण्यात यावा. या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन छेडले जाईल अथवा न्यायालयात दाद मागण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

### राशन दुकान तपासणीतही २ क्विंटलचा घोळ!

पुरवठा निरीक्षण अधिकारी सुजाता मेश्राम यांनी राशन दुकानाची तपासणी केली. त्यांनी तहसीलदारांना दिलेल्या अहवालात होळच्या राशन दुकानात ई पॉस मशीनवरील नोंदीपेक्षा ८९ किलो तांदूळ कमी आढळून आला. तर, १ क्विंटल ९ किलो गहू जास्त सापडला. याचा अर्थ अंगठे घेऊन लाभार्थ्यांना गहू दिला नाही. सदरील अहवालावर जिल्हा पुरवठा विभागाला सादर केला जाणार आहे. दरम्यान, याप्रकरणात राशनमाफियांचा पुरवठा विभागावर राजकीय दबाव असल्याचा आरोप केला जात आहे.

### आ. अमित गोरखे यांच्या लक्षवेधीचा मोठ्या कंपनीला दणका, कंपनी काळ्या यादीत

## मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले कारवाईचे आदेश

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधिमंडळाच्या सध्या सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान, जनहितार्थ लक्षवेधी सूचनांवर झालेल्या चर्चांनी सभागृहात अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले. आमदार अमित गोरखे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बांधण्यात आलेल्या मौजे खेड-मानेवाडी ते शिंपोरा रस्त्यावरील नांदणी नदीवरील पुलाच्या कोसळण्याबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला.



अमित गोरखे यांनी सभागृहाला सांगितले की, हा पूल २५ मे, २०२५ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि अतिवृष्टीमुळे वाहून गेला. विशेष बाब म्हणजे, हा पूल सन २०१२-२०१३ मध्ये, म्हणजेच अवघ्या १२ वर्षांपूर्वी बांधण्यात आला होता. इतक्या कमी कालावधीत पूल कोसळल्याने त्याच्या निकृष्ट दर्जाच्या बांधकामावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. त्यांनी या ठेकेदारावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी केली, तसेच संबंधित ठेकेदाराला काळ्या यादीत टाकण्याची विनंती केली.


यावर ग्रामविकास खात्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहात उत्तर देताना सांगितले की, या प्रकरणाचा चौकशी अहवाल शासनाला सादर झाला आहे. मात्र, या चौकशी अहवालामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत असल्याने, या प्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात येईल. तसेच, जोपर्यंत ही पुनर्चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत संबंधित ठेकेदारावर तातडीने कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात येणार आहे. तसेच, संबंधित आणि चौकशी दरम्यान समोर येणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री जयकुमार गोरे यांनी सभागृहात दिली.

आमदार गोरखे यांच्या या लक्षवेधी सूचनेमुळे सार्वजनिक बांधकाम प्रकल्पांच्या गुणवत्तेचा आणि जबाबदारीचा प्रश्न ऐरणीवर आला. मंत्री महोदयांनी तातडीने कारवाईचे आदेश दिल्याने, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई होईल आणि भविष्यात अशा घटनांना आळा बसेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## निर्धार नवपर्वाचा - पदाधिकारी संवाद मेळाव्यास उपस्थित रहा : शेख अमर

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिलजी तटकरे, मा.मंत्री आ.धनंजय मुंढे, मा.आ.अमरसिंह पंडित, आ.विजयसिंह पंडित, जिल्हाध्यक्ष अँड.राजेश्वर चव्हाण इतर मान्यवरांच्या उपस्थितीत निर्धार नवपर्वाचा - पदाधिकारी संवाद मेळाव्या चे आयोजन करण्यात आले आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बीड जिल्ह्यातील आजी माजी आमदार, खासदार, प्रदेश पदाधिकारी, सर्व तालुकाध्यक्ष-शहराध्यक्ष, महिला, युवक युवती, फ्रंटल सेल चे अध्यक्ष व कार्यकारणी तसेच जिल्हा कार्यकारणी, जि.प.व प.स.सदस्य, आजी माजी नगराध्यक्ष, नगरसेवक, से.स.सो. चेअरमन, सरपंच, ग्रा.प.सदस्य, बाजार समिती सभापती-संचालक तसेच प्रमुख पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्यास उपस्थित रहावे असे आवाहन मा. नगरसेवक तथा प्रदेश उपध्यक्ष शेख अमर जैनुद्दीन यांनी केले आहे. दि.२० जुलै २०२५ वार, रविवार सकाळी ठिक १०:३० वाजता स्व.यशवंतराव चव्हाण नाटय़गृह, बीड येथे होणार आहे, असे शेख अमर जैनुद्दीन प्रदेश उपाध्यक्ष (कामगार अघाडी) रा.कॉ.पा.बीड यांनी सांगितले.

## वन्यजीव संरक्षण कायदा रद्द करा यासाठी आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चा सत्रासाठी उपस्थित राहणार : रघुनाथ पाटील

कडा । प्रतिनिधी

दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब या ठिकाणी मंगळवार दि.२२ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता ऑर्गनायझिंग कमिटी फार्मर्स अँड फॉरेस्ट ड्वेलर्स पार्लमेंट यांच्यावतीने राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. या संघटनेचे चेअरमन अँड.फ्रान्सिस जॉर्ज खासदार कोट्टयम लोकसभा केरळ आणि पि.टी जॉन जनरल मॅनेजर ऑर्गनायझिंग कमिटी फार्मर्स अँड फॉरेस्ट ड्वेलर्स पार्लमेंट केरळ यांनी रघुनाथदादा पाटील राष्ट्रीय अध्यक्ष भारतीय किसान सांघ-परिसंघ (सिफा) तसेच अध्यक्ष शेतकरी संघटना महाराष्ट्र राज्य यांना मार्गदर्शन व चर्चा करण्यास आमंत्रित केले आहे.

या चर्चासत्रात वन्य प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या मानवी मृत्यू आणि उपजीविकेच्या विनाशात चिंताजनक वाढ होत आहे. यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी हे महत्त्वाचे चर्चासत्र भारतातील बागायतदार, लहान आणि सीमांत शेतकरी, आदिवासी नेते, शेतकरी संघटना,



बागायत कामगार, वकिल आणि कायदेकर्त्यांना एकत्र आणणार आहे. सन १९७२ च्या वन्यजीव संरक्षण कायद्यामुळे शेती उध्वस्त होत आहे. शेतकऱ्यांना शेती करणे जिकरीचे झाले आहे. बिबट्या, मोर, हरणे, हत्ती, सायाळ, ससे, रानडुकरे, वानरे, गवे, अस्वले असे वन्य प्राणी शेतीचे व शेतकऱ्यांच्या पाळीव प्राण्यांचे अतोनात नुकसान करत आहेत. वन विभागाकडून तोकडी मदत देऊन बोळवण केली जात आहे. या प्रश्नावर वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ असल्यामुळे वनविभाग घेऊ शकत नाही. अलीकडील आकडेवारीवरून वन्यजीवांशी संबंधित मृत्यू आणि पीक विध्वंसात चिंताजनक वाढ दिसून येते. २०२४ मध्येच, जंगली हत्तींनी २,८०० हून अधिक लोकांचा बळी घेतला, ज्यामध्ये वाघ, बिबट्या आणि इतर प्राण्यांचे शेकडो बळी गेले. वनवासी आणि वन्यजीव यांच्यातील वाढता संघर्ष समग्र, मानवी आणि पर्यावरणीयदृष्ट्या योग्य धोरणांची तातडीची गरज अधोरेखित आहे.

वन्यजीव संरक्षण कायदा, १९७२ मध्ये आवश्यक सुधारणांवर धोरणकर्ते आणि कायदेतज्ज्ञांशी संवाद साधून या सूचना केंद्र सरकारला देणार आहेत. वन संवर्धन आणि वन्यजीव व्यवस्थापनात आदिवासी आणि स्थानिक समुदायांच्या होणारा त्रास.वन्यजीव हल्ल्यांमुळे प्रभावित झालेल्या पीडितांना आणि समुदायास तातडीक मदत देणे. याबद्दल सविस्तर चर्चा होणार आहे. सदर चर्चासत्रात देशभरातील वेगवेगळ्या राज्यातील बागायतदार, लहान आणि सीमांत शेतकरी, आदिवासी नेते, शेतकरी नेते, वन कामगार, वकिल, सामाजिक संस्था आणि कायदेकर्ते उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष शेख अजिमोद्दीन यांनी दिली आहे.

## आत्महत्या शेतकऱ्यांच्या वाढल्या, कर्जमाफी द्यावीच लागणार : धनंजय गुंदेकर

बीड । प्रतिनिधी

कर्जमाफी वरून शेतकऱ्यांमध्ये सरकारविरुद्ध प्रचंड संताप आहे. आश्वासन देऊनही सरकार कर्जमाफी देत नसल्याने आता बीड जिल्ह्यातही शेतकऱ्यांचे आंदोलन उभे राहत आहे. पालवण (तालुका बीड) येथे आज शेतकऱ्यांशी संवाद साधत ७/१२ कोरा अभियान धनंजय गुंदेकर यांनी सुरू केले आहे. यावेळी शेतकऱ्यांनी बँकेकडून आलेल्या नोटीस दाखवल्या. सक्तीने कर्ज वसूल करणाऱ्या बँकांचा यावेळी निषेध नोंदवण्यात आला.



पिकाला योग्य भाव नाही, उत्पन्न निघत नाही अशात निसर्ग प्रचंड बेभरवशी राहत असून यंदा दुबार पेरणीचे संकट असल्याने कर्जमाफी मिळायलाच हवी अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. संवाद दौरा बैठकीवेळी श्रावण मस्के, शिवाजी मस्के, पिनू जटाळ, दिनकर जटाळ, गंगाधर मस्के, आत्माराम पवार, अश्रुबा नजान, विनायक जटाळ, बाबासाहेब मस्के, अशोक पवार, विलास मस्के, गोविंद मस्के, अशोक शेळके, शुभम मस्के, बालू मस्के, लक्ष्मण मस्के, माऊली साबळे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठक समन्वय अशोक पवार यांनी केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT